# मेंदी

इंदिरा

१९६९

REFBK-0016292

मौज प्रकाशन गृह

मुंबई

तसे न वे
जादा व

1

मेंदी

इंदिरा

REFBK-0016292

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 16292

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना

# मेंदी

इंदिरा

मौज प्रकाशन गृह
मुंबई

**मौज प्रकाशन : ८४**

दुसरी आवृत्ती : १९६३
पुनर्मुद्रण : १९६७

पहिली आवृत्ती : १९५५ : कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे

© १९६७, इंदिरा संत

मुखपृष्ठावरील चित्र :
पद्मा सहस्रबुद्धे

**किंमत साडेतीन रुपये**

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
वा० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

# अनुक्रम


१. मेंदी १
२. एक कळावें २
३. दुःख तुझें ३
४. मोरपीस ४
५. शिलालेख ५
६. जातां जातां अवचित ६
७. वावुळ ७
८. रंगमंच ८
९. अशीच येते कधीं एकदा ९
१०. शिकवलेंस तूं १०
११. निवडुंगाच्या शीर्ण फुलाचें ११
१२. भरदुपार १२
१३. व्रत १३
१४. नांव तुझें तर १४
१५. हवा झुकत काजवा १५
१६. मावळतीला दार घराचें १६
१७. तळ्यांत १७
१८. तरळत उतरति १८
१९. उशी १९
२०. स्तंभ २०
२१. दिनदर्शक २२
२२. वाटचाल २४
२३. भय २६
२४. हस्त २७

२५. तवंग २९
२६. कारा ३०
२७. मरवा ३१
२८. सुरंगा ३२
२९. साथ ३३
३०. आषाढ ३४
३१. घुंगुर ३५
३२. ऐकतील जर पिंपळपानें ३६
३३. कुब्जा ३७
३४. कां कळतें ३८
३५. वाट पाहतें ३९
३६. मृणमयी ४०
३७. लाख एक घोकलें ४१
३८. भयभीत ४२
३९. बाधा ४३
४०. काय तूंच तो ४४
४१. मुळि न कसें डचमळतें पाणी ४५
४२. हिरवे पिवळे तुर उन्हाचे ४६
४३. उभी तुळस वेल्हाळ ४७
४४. हिशेब ४८
४५. अंधाराच्या संथ जळांतुन ४९
४६. येतिल दोनच हिरवीं पातीं ५०
४७. तो चहा गुलाबी ५१
४८. मोवरा ५२

४९. मघाशीच की ५३
५०. घनावळी ५५
५१. एक हवें मज ५६
५२. रात्रच की स्तब्ध उभी ५७
५३. तूं गेल्यावर ५८
५४. आरसेमहाल ५९
५५. नुक्ती विरली ६१
५६. "एक विचारूं !" ६२
५७. हसूनीच विसरावें ६३
५८. दावण ६४
५९. अधांतरींच्या निळ्या तळ्यांतुन ६६
६०. अंधाराच्या रेतीवरती ६८
६१. कळशी ६९
६२. आलें मी ७१

# मेंदी

मेंदी भरल्या नखानखांचें
        आलें चालत पिवळें पाउल;
ओल्या मुरमीं बांधावरल्या
        बाळतणाला लागे चाहुल.

घट्ट धरुन वाऱ्याच्या बोटा
        उभें राहिलें करून दाटी;
लाल पऱ्यांचीं जर्द विमानें
        बघतांना थरथरलीं पातीं.

आल्या उतरुन लाल पऱ्या अन्
        पोपटपानें हिरवीं झालीं;
पात्यावरची जडण रुपेरी
        मेंदीवरती खळकन् ढळली.

दिमाखांत पण तसेंच पाउल
        निघून गेलें, होउन ओलें;
बाळतणाला निळ्या अभाळीं
        मेंदीवाचुन कांहि न दिसलें.

फुलपंखी कुणि हळुच येउनी
        उठवी त्याला त्या स्वप्नांतुन :
"पहा कशी रे, खुलली मेंदी
        या पऱ्यांवर, त्या पानांतुन..."

वा. क्र. १८२९२

## एक कळावें

मला न वाटे कधी कळावें
कुठे चालली वाट चिमुकली;
माळावरुनी, बनाखालुनी,
गूढ निरागस कोठे झुकली.

मला न वाटे कधी कळावें
सुगंध कसला पुढिल क्षणाला
आणि पाकळीवरी तयाच्या
फिका गडद वा रंगहि कसला.

मला न वाटे कधी कळावें
कां हें जीवन लहरी, मंथर,
दिपतें, झुकतें, भितें नि लपतें,
थोडें आतुर, थोडें कातर.

एक कळावें...खेळच सारा
बघत दर्पणीं चालायाचा,
उलट्या छपरावरुनी चालत
निळ्या अभाळीं पडावयाचा.

# दुःख तुझें

दुःख तुझें, दुःख तुझें,
वेदनेस काय कमी...
प्रीतीचें भीतीचें
शस्त्र तया लावित मी.

मी सुटलें, मी सुटलें,
मी हसलें; मी खुललें;
जीवाचें गगनांगण
चांदण्यांत नितळ निळें.

—पण कसला डाग इथे :
जखमेंतिल रक्तच तें;
वरुन जरी नितळ निळें
आंतुन कां भळभळतें.

भावनाच सूक्ष्म अशी
भीतीने उघडी कां ?
खोल कुठे उसवुन ये
प्रीतीचा की टाका.

दुःख तुझें, दुःख तुझें,
वेदनेस काय कमी...
सुटकेचा भास पुरा...
जाइल तें...जाइन मी.

## मोरपीस

बालपणींच्या गमतीजमती
एक त्यांतली अजून हसते :
पुस्तकांतलें मोरपीस तें
हळूच गालावरुनी फिरतें.

सक्तीचें करिं भकास पुस्तक,
अर्थ ज्यांतला येत न उमजुन;
अगंतुकांची मल्लीनाथी
चघळायाचा चोथा आपण;

अभ्यासाचें गभीर नाटक :
शब्दांचीं टरफलें घोकतें.
बोट खुणेचें हळूच काढुन
मोरपीस तें बघतें... बघतें.

## शिलालेख

चिमूटभर अंधार प्राशुनी
        मिटे पापणी, थकले डोळे;
अंधारांतुन त्या इवल्याशा
        उसळुन येतें विश्व निराळें.

अंधारांतच अंधाराची
        सुरू होतसे आतषबाजी;
झगमग करती रेषाटिंबें,
        बनती चित्रें क्षणास ताजीं.

गालिचांतली नक्षी सुंदर,
        फुलबाजाचा तसा फवारा,
टिंबांचा अन् रंगित ओहळ
        प्रपातापरी कोसळणारा...

हळू उमटती अंधारांतुन
        मानवाकृती भेसुर विकृत;
कधि न कल्पिल्या विरूपतेचीं
        भुतेंच सारीं येती नाचत.

असलीं चित्रें, असल्या आकृति,
        शिलालेख हे कुठले, कुठले;
अर्थांविण ते बघतां बघतां
        थकले डोळे आणखि थकले.

# जातां जातां अवचित

जातां जातां अवचित
        तुझ्या दारापाशीं आलें
आणि सामोरे येतांना
        डोळे विस्मित हासले.

किती आग्रह चहाचा,
        तशी सुपारी स्वादिष्ट,
'पुन्हा कधी 'ची सलामी
        निघतांना नजरेंत.

चहावरील वाफेचें
        धुकें दाटलें वाटेंत,
सुपारीच्या आग्रहाने
        अधू वाटे तळहात.

मनांतील आजीबाई
        नाकावरी ठेवी बोट;
थांबायाचें नाही कधी
        असें पुन्हाशीं वाटेंत.

# वाघुळ

जरा उघडतां डोळे दिसतें
चित्र रिकामें समोर येथुन;
पडल्या पडल्या क्लांत मनाला
बाह्य जगाचें जराच दर्शन.

आकाशाचा इवला आयत,
तशींच खाली इवलीं शेतें,
अधांतरींच्या तारेवरती
विदीर्ण वाघुळ लटके उलटें.

—उगा मनाला एकच चाळा
बघायचें तें डोळे खिळवुनि;
आधिच शिणल्या नेत्रावरती
त्या चित्राची चढते ग्लानी.

शून्यांतुन ये धावुन वाघुळ
—तीक्ष्ण नखें अन् पंख कापरे—
बघतें रोखुन विद्रुप डोळे;
थिजतां थिजतां रक्त थरारे...

भीतीचा कड बसतां खाली
कूस बदलतें...पुरतें कळलें...
उरलासुरला पिवळा मोहर
पंखांनी तें झडपुन गेलें.

# रंगमंच

निळी कुसुंबी धूसर संध्या,
        हिरवा माळ नि पिवळा मोहर,
कुठे कुठे अन् पाणथळींतिल
        रंगित पाणी करतें थरथर.

मखमालीचा सद्राच पडदा
        कधी जायचा वरती सरकुन;
इथे विजेच्या उबट प्रकाशीं
        बसलें तिष्ठत निष्क्रिय जीवन

आरोळ्यांची उठवी दंगल,
        शिट्या फुंकतें अधीर होउन.
अध्यात्माची देत जांभई
        अखेर पडतें पेंगुन झिंगुन.

मखमालीच्या पडद्यापुढती
        केव्हापासुन तिष्ठत जीवन,
तिष्ठत जीवन केविलवाणें
        रंगमंच नव मनांत उभवुन.

# अशीच येते कधी एकदा

अशीच येते कधी एकदा
उत्साहाला भरती ताजी
आणि मनाच्या अवकाशामधि
मनोरथांची आतषबाजी.

कालच्याच त्या जुन्या जगाचें
आज बनावें नवें खेळणें;
तीन विटांच्या कष्टांवरती
भातुकलीचें चढतें लेणें.

पाककुशलता चटणीपासुन,
वस्त्रामधली रंगसंगती,
बाजारांतुन सफर मजेने,
आणि कुणाशीं गप्पागोष्टी.

उगाच वाटे फूल खुडावें...
उगाच वाटे गाणें गावें...
दुधामिठाचे हिशेब बथ्थड
निळ्या कागदावरी लिहावे.

—लिहायचा तर लिहितां यावा
अशा क्षणांचा अर्थ सुसंगत.
मनोमनाच्या कर्दळीवरी
कसा बहर हा चढतो रंगित

# शिकवलेंस तूं

जपावयाचें तितकें जपतें;
लपवायाचें तसें लपवतें;
परि अर्कापरि, सुगंधापरी,
मनोमनांतुन नकळत विरतें

होतें माझी मला पारखी;
पटे न ओळख, होतें वेडी;
वेडांतच त्या डुबतें, बुडतें,
बसतें उलगत असंख्य कोडीं...

शिकविलेंस तूं सारें जरिही,
शिकविलेंस तूं कांहि न मजला.
पंख पसरले जरी एकदा
येती न पुन्हा आवरायला.

## निवडुंगाच्या शीर्ण फुलाचे

निवडुंगाच्या शीर्ण फुलाचे
झुबे लालसर ल्यावे कानीं;
जरा शिरावें पदर खोवुनी
करवंदीच्या जाळीमधुनी.

शीळ खोल ये तळरानांतुन...
भणभण वारा चढणीवरचा;
गालापाशीं झिलमिळ लाडिक;
स्वाद जिभेवर आंबट कच्चा.

नव्हती जाणिव आणि कुणाची,
नव्हतें स्वप्नहि कुणीं असावें;
डोंगरचढणीवरी एकटें
किती फिरावें...उभें रहावें.

पुन्हा कधि न का मिळायचें तें...
...तें माझेंपण...अपलें आपण;
झुरतें तनमन त्याच्यासाठीं,
उरते पदरीं तीच आठवण

...निवडुंगाच्या लाल झुब्याची,
टपोर हिरव्या करवंदाची.

# भरदुपार

भरदुपार : मार्गावर
क्यू रंगित डगमगतो;
भरदुपार : आणि कुठे
गुलमोहर झगमगतो.

भरदुपार : दूर तिथे
मुरुमाची दरड उले;
भरदुपार : पाण्यावर
मिटलेले लाल कळे.

भरदुपार साठवते
ओळीने दृश्य असें;
साठवितां आठवतें
मनिं कांही तसलेंसें.

मनचें अन् आरसपान्
दुमडुनियां उलगडतें;
स्वच्छ अशा आरशींत
स्वप्न कुसुंबी खुलतें.

भरदुपार तगमगते
स्वप्नाच्या अर्थास्तव :
स्मित अबोध ओठावर,
नजरेंतिल तें लाघव.

## व्रत

कधी कुठे न भेटणार;
　　　　कधि न कांहि बोलणार;
कधी कधी न अक्षरांत
　　　　मन माझें ओवणार.

निखळे कधि अश्रु एक,
　　　　ज्यांत तुझें बिंब दिसे;
निखळे निःश्वास एक
　　　　ज्यांत तुझी याद असे

—पण तिथेच, तें तिथेच
　　　　मिटुन ओठ संपणार;
व्रत कठोर हें असेंच,
　　　　हें असेंच चालणार.

## नांव तुझें तर

नांव तुझें तर लहान साधें
रंगित इवल्या रानफुलापरि;
विरघळतांना सुरांत अस्फुट
रंग सांडती तनूमनावरि.

नांव तुझें तें अगदी साधें :
सोनुकलें तरि फूल विजेचें;
ओठावरुनी हळू फिरवितां
भान घालवी भवतालाचें

नांव तुझें तें...तुझेंच अगदी...
तुलाच तें; पण नव्हेस तूंच.

## हवा झुकत काजवा

हवा झुकत काजवा
        काळ्याशार अंधारांत;
ब्रह्महृदय सुजाण
        हवें उभें खिडकींत;

हवा जरा वाऱ्यासंगें
        ओल्या गवताचा गंध;
पाखराची नीज जशी
        हवी तशी रात्र धुंद;

हवा असा थाटमाट
        असें गूज लिहायाला;
हवी चांदण्याची वाळू
        ओळीवरी शिंपायाला.

# मावळतीला दार घराचें

मावळतीला दार घराचें
—शिणल्या जीवा कधी विसावा—
उभें राहुनी देहलीवरी
नक्षत्रांना निरोप द्यावा.

झेप मृगाची क्षितिजावरतुन;
मुळी न बघतो वळून मागे;
कशास असलें साहस भलतें...
उगा जिवाला तगमग लागे.

रंगविलासी शुक्राचा तर
हर्ष निळा अन् दुःख गुलाबी;
उतरे शिंपत विरह जांभळा,
दे जीवाला धुंद शराबी.

अवचित ढळतो एकच तारा,
एक ओढिने घेतो कोसळ;
बघून होतें मुकें मुकें मन...
निरोपांतलें स्वागत व्याकुळ.

तेजोग्रह ते कुठे, कुठे मी;
कुठे क्षितिज अन् कुठे देहली;
फिरतां तेथुन जड ये पाउल
जाते उरली रात्र निराळी

# तळ्यांत

कसा कुणीं एकाएकी
खडा फेकला तळ्यांत;
उमटल्या वलयांनी
वेडा केला उभा काठ.

झाली उलटीसुलटी
तळपातळी क्षणांत;
चुरा कोरीव लेण्याचा
विरे काठाच्या मातींत.

ओसरतां क्षण एक
पुन्हा सारें थिरावेल;
आणि सावध काठाशीं
लाट उगा उमळेल.

## तरळत उतरति

तरळत उतरति वाऱ्यासंगें
लाख कोटिंनी पिवळीं पानें;
इवल्या टाचांखाली चुरतां
सळसळती तीं नवखें गाणें.

पारंबी अन् रुक्ष भावडी
झुलते अल्लद होउन दोला,
—मुठी चिमुकल्या उष्ण ओलसर—
पिते त्यांतल्या अमृतज्वाला

ज्वाळेमधला तांबुस उजळा,
गाण्यामधला भाव पोपटी,
पुन्हा उमटला, पुन्हा रंगला
धूसर ओल्या डहाळीवरती.

## उशी

ती कहाणी...तीं स्वप्नें
ती आशा...तीं स्मरणें
तें सारें...
येतें जें मनिं दाटुन
घुमसत जें श्वसनांतुन
चितळत जें नयनांतुन
तें सारें...
तें सारें तुजपाशीं.

## स्तंभ

काळ्या पाषाणाचें मंदिर,
उंच तयाचें चित्रित गोपुर,
प्राकाराला सावरणारी
स्तंभमालिका विशाल गंभिर.

घोटिव काळ्या पाषाणावर
कंगोऱ्याची नक्षी सुंदर;
उंच उभे हे स्तंभ हारिने,
ध्यानमग्न की कुणी मुनीश्वर.

उभ्याउभ्याने हात जोडुनी
आंत क्षणभरी देवीदर्शन;
इथे परी या स्तंभापाशीं
विसावतें तन, विसावतें मन.

कुणी गांजलें कष्टी जीवन
इथेच धावे आधाराला;
चंगीभंगी तसाच कोणी
इथे टेकतो 'बघावयाला'.

इथे चालती बेत कुणाचे
मंगल आणिक दुष्ट अमंगल;
भल्याबुऱ्या अन् भेटीचेंही
इथे असावें संकेतस्थल.

—अशी सदाची स्तंभापाशीं
        रेंगाळावी अखंड वर्दळ,
तनूमनाचा दर्प साहुनी
        काळवंडलें पाषाणी दळ.

# दिनदर्शक

येतां पहिली जाग सकाळीं
        तिथेच वळते नजर ठराविक
मुठींत धरुनी काळ चुरुचुरू
        चोखित जेथे तें दिनदर्शक.

—आणिक बघतां बघतां तेथे
        निद्रेमध्ये मिसळे जागृति;
लाल नि काळे तीस आकडे
        हिरव्या पानावरती विरती.

तिथे वसाहत तीस घरांची :
        बंद तिचीं तर अवघीं दारें;
दिव्य नि भीषण मूक रूप तें
        आणी अंगावरी शहारे.

किल्ली ज्याची त्याच्यापाशीं.
        भरे उरीं जरि भीती साहस
भागच पडतें दार उघडणें
        आंत यक्षिणी किंवा राक्षस

तिथेच कुणिं तरि खेळ मांडिला
        तीस घरांच्या भातुकलीचा;
तीस घरांतिल तीस स्वामिनी
        आव आणिती संसाराचा.

—खेळ संपतां, तिथे पसारा;
चट्टामट्टा करून पळती,
जातांना परि मिस्किल पोरी
टुक्टुक् करुनी मला हिणविती.

रागावुन मी पुढे पाहतां
समोर दिसतें तें दिनदर्शक :
बालमुकुंदापरि पानावर
काळ-रिंगणें चोखी बालक.

# वाटचाल

वाटचाल तर रोजचीच ही
        रोजच मजला चालायाची;
रोजच माझ्या मनची मोटर
        गतींत चढल्या पळावयाची.

राजमार्ग जणु सारिण काळी;
        दो बाजूंनी रेखिव कुंपण;
पुढती पाउलवाट चिमुकली
        स्वैर धावते तृणांकुरांतुन.

सुखवस्तूंचे महाल इकडे,
        इकडे कोंगाट्यांचीं पालें,
इकडे हिरवा माळ तापतो,
        इकडे पिवळी लक्ष्मी खेळे.

या बाजुस ही रुक्ष कवायित,
        इथे थबकतो कळप गुरांचा,
गजागजांचा तुरुंग येथे,
        —खडा पाहारा उभा सदाचा.

कळक डोलती गांवकुसावर;
        खाली निघते धार दुधाची;
आणिक माझ्या मनची मोटर
        गतींत चढल्या पळावयाची.

सुखवस्तूंच्या दमट भावना,
कोंगाट्यांचा घाम भुकेला;
माळावरच्या हिरव्या वृत्ती;
शेतावरचा तसा तजेला.

रवंथांतला संथ गारवा,
उग्र दर्प अन् कवायतीचा,
मुकीं आसवें तुरुंगांतलीं
स्निग्ध फेस अन् चंबूवरचा,

—असेंच सारें; असलें कांही
धुकें साचतें काचेवरती;
कठोर जाणिव जीवनांतली
पुसते त्याला पुन्हा पुन्हा ती.

वाटचाल तर रोजचीच ही
रोजच मजला चालायाची;
रोजच माझ्या मनची मोटर
गर्तीत चढत्या पळावयाची.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...६३८०६... वि: ...८१।८४...
क्रमांक ...१९८८... नों. दि. ...४।३।६७

# भय

मेजावरती कागद चौरस;
होतें जवळच पेन सानुलें;
मीहि रिकामी; रिकाम्या मनीं
कांहीबाही वरती लिहिलें.

त्यांतुन झालें दूर जराशी
लिहून होतां अक्षर अक्षर;
घाबरलें अन् काय तरी मी :
भुताटकीचें होतें तें घर...

शून्य रिकामें विषण्ण दालन.
वाजे पाउल, उगाच चाहुल,
खोल कुठे तरि कातर संगित,
नदीतळाची जाणिव व्याकुळ.

## हस्त

हस्ताचें हें ऊन तापतें;
        अंगाराच्या झळा वर्षती;
वर्षा-वसुधा-मीलनांतली
        विरहाची ही जाणिव भलती.

चिंब पाणथळ; शिथिल माळ हा
        मान टाकुनी पडला तापत;
काळींपिवळीं फूलपाखरें
        ओल्या गवतावरती उडवित.

माळावरल्या पालामधली
        रंगित वाकळ, तशीं जुनेरीं,
विसरूं बघती रंग आपुले
        उन्हांत हिरव्या आणि रुपेरी.

इथे गिधाडें जमिनीसरशीं
        चोच आणखी पाय टेकुनी
टिपून घेती सौख्य उन्हाचें
        रुंदट मोठे पंख पसरुनी.

निळ्या तापल्या वातावरणीं
        चतुर अभ्रकी तरळत फिरती,
क्षितिजाकडल्या डोंगररांगा
        स्वप्नाचें की रूपच घेती.

ऊन जरी हो असह्य तापद
इथे जराशी उभी राहतें
संस्कारांच्या पुटांखालुनी
माझ्यांतिल मी मला सांगते :

“मनांतलीं हीं फुलपाखरें
अशींच उडवित इथे रहावें;
मनोमनींचें सणंग रंगित
माळावरती फेकुन द्यावें.

तनूमनाच्या कठोर रेखा
अशाच जाव्या झरझर विरुनी;
स्वप्नांतिल मी स्वप्नच व्हावें,
उन्हांत जावें ऊन होउनी.”

# तवंग

शेतावरती इथे नाचणी
        कशी बिलगते पायाभवती;
थरथरणारीं नाजुक पातीं
        इतुकें कसलें गूज सांगती !

इवलीं इवलीं हीं कारंजीं,
        उडती ज्यांतुन हिरव्या धारा;
हिरवें शिंपण अंगावरती,
        रंग उजळतो त्यांतुन न्यारा.

त्या रंगाची हिरवी भाषा,
        अजाण मी, मज मुळि न कळे तर;
तरंगतो परि मनोमनावर
        त्या रंगाचा तवंग सुंदर.

## कारा

सभोवताली जरी अगोचर
उभे खांब दर इंचावरती,
आणि भावना अडवायाला
उभे शब्द हे ओठावरती

खांबाभवती अखंड फिरती
तुझेच डोळे प्रेमळ सावध.
पंख गोठती कायेवरती,
चोच वासते मुकी नि व्याकुळ.

—तुझ्याविना हा तुझा पिंजरा,
तुझ्याविना हा तुझा पहारा;
मुक्त मला कर इथुन एकदा
प्रीतीस्तव कां...कां...ही कारा...

# मरवा

पुस्तकांतली खूण कराया
        दिलें एकदा पीस पांढरें;
पिसाहुनी सुकुमार कांहिसें
        देतां घेतां त्यांत थरारे.

मेजावरचें वजन छानसें
        म्हणुन दिला नाजूक शिंपला;
देतां घेतां उमटे कांही,
        मिना तयाचा त्यावर जडला.

असेंच कांही द्यावें...घ्यावें...
        दिला एकदा ताजा मरवा;
देतां घेतां त्यांत मिसळला
        गंध मनांतिल त्याहुन हिरवा.

# सुरंगा

गडद नीलिमा चष्म्यावरचा,
शर्टावरचीं बटणें काळीं,
अंगठींतला लाल खडा अन्
बूटावरची उदी झळाळी.

पेन मुलायम हिरवट राखी,
गडद जांभळें नाजुक पाकिट,
पट्ट्यावरचा राजवर्ख अन्
गहन रुपेरी घड्याळ चौकट.

रंग रंग हे जमती, भिनती;
मीच होतसें इंद्रधनू अन्
तुझ्या जिवाच्या आकाशावर
अशी सुरंगा रहातें रेलुन

## साथ

हा रस्त्यावरचा
        दीप क्षीण तेजांत
तेवतो एकटा
        भीषण काळोखांत.

—तिष्ठते कुणि तरी
        समोरच्या खिडकींत;
केव्हढी तयाची
        सोबत आणिक साथ

## आषाढ

हिरवी ओली धुंद धरित्री,
अधिरें काळें कुंद अभाळहि,
झिमझिम लाघट पाउसधारा,
झोंबे उद्धट वारा थंडहि.

आषाढाचा हिरवाकाळा
जहर विषाचा गहिरा पेला;
काळें काळें त्यांत रसायन,
हरित काजवे-तुषार त्यांतुन.

पेल्यांतिल त्या रसायनाची
चटक सारखी कशी जिवाला;
घ्यावा घोट नि घ्यावी लज्जत
अंगांतुन जरि निघती ज्वाळा.

# घुंगुर

टाकुन अवघा तोल तुझ्यावर
ढगाढगांतुन चालायाचें;
कुंपणतारांवरुन विजेच्या
खुशाल पाउल टाकायाचें.

—तूंच लाविली ओढ अशी ही.
धूळ निघाली उंच उंच वर;
जमिनीपासुन सुटलें पाउल,
गळलें पायामधलें घुंगुर.

# ऐकतील जर पिंपळपानें

कातरवेळेवरती थबकुन
        ऐकतील जर पिंपळपानें
उत्तरांतला कडू गोड मध
        शोषतील तीं तीक्ष्ण सुईने;

पितील जर का काळ्या लाटा
        उत्तरांतलें अधिरें काहुर.
टिपेल तें अंधार वाकुनी
        तळ्यास लावुन ओठ अनावर;

—प्रश्न तुझ्या डोळ्यांत उभा की
        घनभारित ये घन ओथंबुन,
ओठावर लखलखतें उत्तर.
        शब्दामध्ये कसें धरूं पण.

## कुब्जा

अजून नाही जागी राधा,
अजून नाही जागें गोकुळ;
अशा अवेळीं पैलतिरावर
आज घुमे कां पावा मंजुळ.

मावळतीवर चंद्र केशरी;
पहाटवारा भवती भणभण;
अर्ध्या पाण्यामध्ये उभी ती
तिथेच टाकुन अपुलें तनमन.

विश्वच अवघें ओठां लावुन
कुब्जा प्याली तो मुरलीरव;
डोळ्यामधुनी थेंब सुखाचे :
"हें माझ्यास्तव...हें माझ्यास्तव..."

# कां कळतें

मातीची खोल ओढ,
गगनाचा एक वेध,
पाण्याचें गडद मौन,
वाऱ्याचें अधिरेपण...
कां कळतें—
हें असलें, कां कळतें...
जीवाचा करुन धूप
तुजभवती घमघमतें—
हें असलें, कां कळतें...

## वाट पाहतें

वाट पाहतें तुझी अशी मी
तृप्त सुखाच्या निवांत कुरणीं,
सरींत पहिल्या,
साज लेवुनी धूळफुलांचा,
होउन पाउलवाट सुगंधा.

वाट पाहतें तुझी अशी मी...
अतृप्तीच्या खोल अभाळीं,
अंधारामधि,
नक्षत्रांची उटी लावुनी,
स्वर्गंगा की तेजोगंधा.

वाट पाहतें तुझी अशी मी...
वाटेपरि भावोत्कट होउन,
वाटच होउन,
वाट पाहतें तुझी अशी मी...

## मृण्मयी

रक्तामध्ये ओढ मातिची,
मनास मातीचें ताजेपण,
मातींतुन मी आलें वरती,
मातीचें मम अधुरें जीवन.

कोसळतांना वर्षा अविरत
स्नानसमाधीमधें डुबावें;
दवांत भिजल्या प्राजक्तापरि
ओल्या शरदामधि निथळावें;

हेमंताचा ओढुन शेला
हळूच ओलें अंग टिपावें;
वसंतांतलें फुलाफुलांचें
छापिल उंची पातळ ल्यावें;

ग्रीष्माची नाजूक टोपली,
उद्वावा कचभार तिच्यावर;
जर्द विजेचा मत्त केवडा
तिरकस माळावा वेणीवर;

आणिक तुझिया लाख स्मृतींचे
खेळवीत पद्रांत काजवे,
उभें राहुनी असें अधांतरिं
तुजला ध्यावें, तुजला ध्यावें.

# लाख एक घोकलें

लाख एक घोकलें
        लाख लाख ठरविलें,
येतां परि क्षण समोर
        मीच नाहि राहिलें.

ती न अता राहिलें.
        त्या क्षणींच संपलें.
अविचारी वीज कशी
        लकलकून कोसळे.

त्या क्षणींच संपलें
        जरि न तीच राहिलें.
थरथरत्या पापणींत
        ओठांच्या विलगतेंत
हृदयाच्या द्रुत लयींत
        तीच तीच राहिलें.

## भयभीत

विचारांची घोडदौड
        येई उडवीत धूळ,
तुडवीत टापांखाली
        मन माझें भयाकुल.

कधी भवसागरांत
        उठे भीषण भोवरा;
असहाय माझें मन
        फिरे त्यांत गरगरा.

कधी होई अवचित
        निराशेची वारामोड,
उन्मळल्या केळीपरी
        मन घेई पुरा मोड.

म्हणूनीच येतां रात्र
        मन जाई घाबरून,
भयभीत ससापरी
        बसे दडून लपून.

## बाधा

झिमझिम वर्षत चांदण्यांतुनी
अविरत कसला विखार खाली;
झपाटलेला वृक्ष अचेतन,
हिरवीं पानें पडलीं काळीं.

मंतरलेल्या गूढ भुईवर
त्या वृक्षाची पडे सावली;
फांदीफांदीमधुनी निद्रित
मंत्रमुग्धशी नागिण काळी.

दूर उभी मी खिळलें पाउल,
खिळले डोळे त्या दृश्यावर;
पायतळांतुन उंच सावली
मिळे जाउनी त्या छायेवर.

चळली नागिण, झाली सळसळ,
चढे तनूवर विळखे टाकुन;
निश्चल कातर डोळ्यामध्ये
डंख मारते फणा उभारुन.

बाधा झिमझिमली कायेवर;
अर्थ घुमतसे शब्दा सोडुन;
केविलवाणे दोनच अश्रू;
ओठ कोरडे गिळती त्रिभुवन.

# काय तूंच तो

काय तूंच तो वादळवारा;
उलटेंसुलटें केलें जीवन.
मेघच का तूं कभिन्न काळा;
वीज रुतविली कणाकणांतुन.

की तूं दुर्गम पाउसधारा;
जळप्रळंयांतुन नेलें वाहुन...

—आलास असें होउन कांही.
घुसमटलें मी, जळलें, बुडलें;
पुन्हा कशी पण तळहातावर
नवजाता मी भ्यालें...हसलें!

## मुळि न कसें डचमळतें पाणी

पाणवठ्याहुन घराकडे ती
संथ उचलते पाय धुळींतुन;
भ्याली न कशी तिनिसांजेला;
मुळि न कसें किणकिणलें कंकण.

कळशीवरचीं तांबुस बोटें
कशिं न हेरती खड्यास चावट;
अडखळलें ना कसें जोडवें
येतां अडवी गोड सुरावट.

कसे आज ना वळले डोळे
शोधायाला कुणास मागे;
कसें आज ना ओठीं काहुर,
बघेल कुणि तरि आगेमागे!

भरली घागर माथ्यावरती,
मुळि न कसें डचमळतें पाणी;
कमरेवरती भरली घागर,
मुळि न कसें डचमळतें पाणी.

## हिरवे पिवळे तुरे उन्हाचे

हिरवे पिवळे तुरे उन्हाचे
खोविलेस केसांत उगा कां;
वाऱ्याचें हळु पीस फिरवुनी
उसळल्यास हिरव्या लहरी कां;

पिवळीं काळीं फूलपाखरें
फेकुनि मजवर, भिवविसि कां;
लाल फुलांनी भरतां ओंजळ
माझी मजवर उधळसि कां;

सहसा शिंपुन गुलाबपाणी
ढगाआड दडलास वृथा कां;
प्रतिबिंबांनी निळ्याजांभळ्या
तनमन अवघें व्यापिसि कां;

—अशी हरवली राणी मीरा.
अशी हरवली राधा गवळण.
असेंच मी मज हरवुन जावें
हेंच तुझ्या मनिं जागत का.

## उभी तुळस वेल्हाळ

कसें केव्हा कलंडतें
        माझ्या मनाचें आभाळ
आणि चंद्र-चांदण्यांचा
        दूर पोचतो ओघळ.

उरे तुडुंब तयांत
        काळोखाचें मृगजळ;
रितेपणाच्या डोहाची
        आंत ओढी उचंबळ.

मंत्रविद्ध मध्यरात्र
        उभी झुकून काठाशीं,
जन्मोजन्मींच्या दुःखाचा
        राळ धरून उराशीं,

ओढ घेऊन पाण्याची
        सूर मारते सरळ;
एक गाठायाचा तळ
        आणि तळींचा अनळ.

पेट घेई मध्यरात्र,
        पेटे काळोखाचें जळ;
दिवसाच्या राखेमध्ये
        उभी तुळस वेल्हाळ.

## हिशेब

—जरा पुढे अन् असे वळा, मग
 पुन्हा असे, अन् तिथेच तें घर;
बघा खुणेला समोर आहे
 सोनतुऱ्यावर पिवळा मोहर.

तेव्हापासुन
 लाल धुळींतिल तीं पद्‌चिन्हें;
मनांत टिपला हिशेब त्यांचा
आभाळाने, सोनतुऱ्याने,
 कुणीं कुणीं अन्...

—हीं या इथलीं खुलास ताठर
 कधीच लुटलीं वावटळीने;
अन् हीं इवलीं, शंकित स्नेहल
 टिपते संध्या रंगखुणेने.

हीं इथलीं तर कंपित आतुर,
 मनांत ठेवी पिवळा मोहर;
आणिक इथलीं...डोह विजेचे,
 भरते ओंजळ रात्र घनांकित !

# अंधाराच्या संथ जळांतुन

अंधाराच्या संथ जळांतुन
असतां चालत
नसतें वरती अभाळ काळें;
क्षितिजानें जें हो वलयांकित;
नसतो खाली धूसर रस्ता,
दोन बिंदुंनी जो मर्यादित;
नसतें अवतीभवती कांही,
शब्दानें जें हो संज्ञांकित.

असतें एकच.

नसतें कांही नयनीं चित्रित;
नसतें कांही कानीं अस्फुट;
नसतें अवतीभवती कांही,
स्पर्शानें जें हो संवेदित.

असतें एकच.

असते एकच हट्टी जाणिव
दंडापाशीं...पदरापाशीं,
मनोमनाला जी संवेदित :
तुझ्यासवें मी असतें चालत.

## येतिल दोनच हिरवीं पातीं

रुतत चाललें तिळातिळानें;
रुतले तळवे, रुतलें पाउल,
रुतले पायहि...उभी तशी मी
बावरलेली, त्या वाळूवर...

दिशादिशांची सुटली जाणिव;
क्षितिजांचें हो नयनीं काजळ;
हृदयापाशीं स्वप्नें ताजीं,
लाट वाळुची अन् ओठावर.

येशिल कधि तरि, दिसेल तेंव्हा
अफाट वाळू...उन्हाखालती;
तुझ्या पावला भेटाया परि
येतिल दोनच हिरवीं पातीं.

# तो चहा गुलाबी

तो चहा गुलाबी,
        चर्चा खळखळणारी;

तो पिवळा रस्ता,
        थट्टा आडवणारी;

तें तळें सावळें,
        झपाटलेलें मौन,

तीं निळीं अक्षरें,
        गुप्त आसवें दोन.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
…६३८०६… …७१०५…
…२९६७… …५।३।७१
ग्रा. क्र. १६२९२
शाखा

 मं दी

# भोवरा

कशी हाक घालूं तरी,
        कुठे आहेस कळेना;
पडसाद उठे लाख...
        तुझी साद उमटेना.

कशी तुला शोधूं तरी,
        कुठे आहेस दिसेना;
डोळ्यांतली काळी झेप
        तुझ्यापर्यंत पोंचेना.

कसें तुला मी आठवूं
        आठवाया नाही बळ;
मीच बुडालें माझ्यांत;
        भोवऱ्याची ओढ खोल !

## मधाशीच की

"आलिस केव्हा ?"

"अताच ही ना—तुझ्यापुढे मी—
तूं आल्यावर."

"किती वर्षांनी भेट पुन्हा ही..."

"वर्षें कुठलीं...मघाशीच की
होतों आपण त्या माळावर
करड्यापिवळ्या गवतावरती;
समोर होतें एक रोपटें...
नुसत्या फांद्या;
काळ्या तारेची गुंतावळ;
होतें टोकावरी तयाच्या
एक पाखरू करडें काळें;
होता भलता काळा वारा;
त्या वाऱ्यावर
भुरुभुरु उडणाऱ्या केसांची
शपथ घालुनी
विचारलें तूं..."

"आठवतें तें धूसर...धूसर;
त्यानंतर पण
कितीक घडल्या अघटित गोष्टी;
कितीक गेलीं वर्षें...वर्षें..."

“उगाच कांही...मघाशीच की—
हीच परतलें त्या गवतांतुन;
अजुन पहा हीं पदरावरती
काडलींस तूं तरी किती तरि
कुसळें कुसळें...
पहा चाचपुन—हें खोटें तर.”

हें खोटें तर...
उभा इथे तूं...हें खोटें तर !
पिवळ्या गवती पात्यावरती
ओघळलेल्या थेंबावरचा
रंगच हा तर...

## घनावळी

धुंद मदालस घनावळी ये
        झेप टाकुनी गगनापाशी;
बघती खालुनि डोळे रुसके
        अडखळली ते बघुन जराशी.

सुचलें कांही, आणिक लगबग
        काढी कटिंची स्वर्णमेखला;
—घळलें हिरवें वस्त्र मुलायम
        झाकी अलगद मत्सर काळा !

## एक हवें मज

एक हवें मज, एक हवें मज,
        दुःख हवें मज असेंच कांही,
जखम जयाची सदाच ताजी
        तीव्र वेदना घुमवित राही.

नको तशी ती कधी भराया;
        नको बधिरता त्या जखमेवर;
नकोत टाके तिला जुळाया;
        नको तिच्यावर शीतल फुंकर.

असा असावा दाह तिचा पण :
        निळी-तांबडी एकच ज्वाला;
बेभानपणीं अंधारांतुन
        तुझ्याकडे ती आणिल मजला.

# रात्रच की स्तब्ध उभी

रात्रच की स्तब्ध उभी
क्षितिजाच्या काठावर;
खिळलेलें पाउल अन्
गिळलेले लाख स्वर.

आवरला तोल कसा,
ठाउक हें एक तिला;
सावरला बोल कसा,
ठाउक हें एक तिला.

गिळलेल्या बोलाची
खिळलेल्या तोलाची
शपथ तिच्या ओठावर,
चढत जिचा रंग मला.

## तूं गेल्यावर

ओठावरचें स्वप्निल हासू
        फुलाफुलावर जातें रंगुन;
डोळ्यामधले अधुरे आसू
        हळूच भरती मधु कोषांतुन;

शब्दामधलें अस्फुट लाघव
        रानपाखरें घेती टिपुनी;
सळसळणारें अन् अवखळपण
        निळ्या अभाळीं जातें उडुनी

रक्तामधली काळी बिजली
        डोहामध्ये जाते मिसळून;
असतें जें जें तुझ्याचसाठी
        तूं गेल्यावर जातें उधळुन.

—तूं गेल्यावर नसतें मीही,
        नसतें माझें...माझें कांही;
उरलेली ही अशी कोण मी
        माहित मजला नाही...नाही.

## आरसेमहाल

भिंग बिलोरी सहा बाजुंनी
बांधुन अरसेमहाल असला
उभें राहुनी मधे, पहावें
रूप आपुलें, छंद मनाला.

—अशी उभी मी व्यासपिठावर;
कुड्या हिऱ्याच्या चमचम करती;
अशी इथे मी मेजापाशी,
सह्या घ्यावया नोकर पुढती;

अशी इथे मी तरूतळाशीं,
वरून ढळतो पिवळा मोहर;
अशी उभी मी देहलीवरी,
समोर संध्या धूसर धूसर;

अशीं तशीं हीं असंख्य रूपें
तुटुन राहती पाऱ्यापाशी;
फुगत चाललीं क्षणाक्षणाने,
डोळ्यावरती चढते बुरशी.

तींच...तींच...तीं पाहुन पाहुन
शिणलें, विटलें, किटलें अंतर;
याहुन कांही नवें दिसावें
ताण मनाला असा भयंकर.

—वेडाची अन् लहर फुटे कधि
देते धडका त्या भिंगावर...
अंगामधल्या उपसुन काचा
पुन्हा पाहतें रूप त्यांत तर!

# नुकती विरली

नुकती विरली क्षितिजावरची
लाल ढगाची ओली चाहुल
नुसतें होतें भुइवर उतरत
अंधाराचें पहिलें पाउल.

आणि तळ्यावर चुकला पक्षी
घालत होता कातर भिरक्या;
तांबुस धूसर अंधारामधि
उमटत होत्या काळ्या रेखा.

वेळ साधुनी हीच नेमकी
वाऱ्याच्या मनिं भलतें आलें;
अचुक टाकलें आणिक त्याने
पाण्यावरती काळें जाळें.

थरथरली कोवळी लव्हाळी
चढतां धागे दोन तिच्यावर;
थरथरली अन् चिंच मुळाशी;
हळूच ढळला तांबुस मोहर.

क्षणैक दिसलें थरथरणारें
एक पाखरू त्या जाळ्यावर;
एक हुंदका खोल मनांतिल
निःश्वासाचे पंख जयावर.

## "एक विचारूं?"

"एक विचारूं?"..."एक विचारूं?"
उगाच असले प्रश्न कशाला;
अपुल्यामधलीं विरामचिन्हें
कधीच गळलीं माहित तुजला.

"कितीक आहे बोलायाचें..."
काय अता तें उगा बोलणें;
वाक्याच्या सनईंत कधी का
घुमेल अपुल्यामधलें गाणें.

कानामात्रावेलांटीचीं
रेशिमचित्रें कशास भरणें.
"लिही" कशाला—त्या धाग्यांतुन
जमायचे का रंग दिवाणे.

नकोत शंका.

नको बोलणें...नकोच लिहिणें...
नकोच तूं अन् नकोच मीही;
—हें सगळें बघ वरचें वरचें,
हवें कळाया तुला...मलाही.

## हसूनीच विसरावें

कष्ट घेत अंगावर
        हसूनही हासवावें
आणि उगाच उथळ
        बोलूनही बोलवावें.

—कसें तूंही म्हणावें त्या
        किती धीराचें जीवन...

समाधीच जीवनाची,
        वर तगर ढळते;
विसाव्यास गवळण
        ऊर फुटे तों भांडते.

उगाच कां असें कांही
        तुला तरी कळवावें;
तुझें अजाण कौतुक
        हसूनीच विसरावें.

## दावण

लडबड करतो लोकरगुंडा;
बाई बसल्या विणीत स्वेटर;
मनचे धागे गुंफित आंतुन
चढती टाके सुई-सुईवर.

छडि आठीची सदाच भाळीं,
कडवट थंडाई ओठावर,
डोळयामध्ये राख शिळी अन्
तापे वाळू आवाजावर.

समोर बसलीं सत्तर बाळें :
सक्तिवयाची केवळ दावण;
गजबज जागा, भुईस खळगे,
एक झरोका कौलारांतुन.

उंच खिळयाला एकच तक्ता
आणिक तोही जुनापुराणा,
प्रकाश साधुन उभा उगीचच
फळा आंधळा केविलवाणा.

ओठावरती बोट आणखी
घड्या हातच्या क्षणाक्षणाला;
बसलीं दुबळीं पेंगत, झुंजत;
कर्कश, रोगट त्यांचा चाळा.

मलूल डोळे उगाच फिरती;
शिणती बोटें पाटीवरती;
विसरायाला शीण जरासा
गळा फुटे तों घोकंपट्टी.

गुदमरलेल्या वातावरणीं
ताप चढतसे मनामनाला;
अर्धीत येथे कमळें ताजीं;
धजे न अश्रू बघावयाला.

# अधांतरींच्या निळ्या तळ्यांतुन

रोज अजोबा उतरुन येती
अधांतरींच्या निळ्या तळ्यांतुन;
काळोखाच्या दुलईमधुनी
बघे चराचर खट्याळ, चोरुन !

शुभ्र रेशमी घोळ झग्याचा,
रुळते दाढी शुभ्र तयावर;
मुठींत झुलतें पीस पांढरें;
खांद्यावरती शुभ्र कबूतर.

चकचकल्या अभ्रकी खडावा;
उठलीं गवतें, उठलें पाणी,
उठले खिदळत तरुवर, पक्षी,
पीस फिरवितां आजोबांनी.

माळाच्या शिरिं भुरकें जावळ,
त्यांतुन त्यांचीं बोटें फिरती;
उभ्या दूर जरि निळ्या टेकडया
जाउन त्यांची हनुवट धरती !

रानफुलांचें, कौलारांचें,
चुंबन घेती हळूच वाकुन;
अन् वाऱ्याच्या मागे देती
शुभ्र कबूतर मजेंत सोडुन !

लाटांच्या फेरांत लागुनी
थयथय नाचति पाण्यावरती
भुऱ्या सावळ्या लाघट छाया;
घोळ झग्याचा धरून फिरती.

अवचित जाती निघुन अजोबा
नादीं लावुन असें चराचर;
जातांना परि जाती घेउन
बाळमुठींच्या खुणा झग्यावर!

# अंधाराच्या रेतीवरती

अजूनही मिटून ओठ,
क्षितिजाला जे लागुन प्याले
आभाळांतील शराब काळी.

अजूनही मिटून नेत्र,
साठविला पापणींत ज्यांनी
स्वप्नमधाचा लाल चंद्रमा.

अजून त्या तिथेच मी,
रेतीवरती अंधाराच्या,
भिजलेली जी नक्षत्रांनी.

अजूनही तशीच मी,
निथळत अवघ्या अंगावरुनी
वीज...विजेचें मादक पाणी...

## कळशी

परतुन येतां पाणवठ्याहुन
काल कुठे तरि
हिनकळलें तें,
कळशीमधल्या पाण्यावरती.

—आणि चितळली पायतळींची
वाट धुक्याची;
तरंगली अन् माथ्यावरची
भरली कळशी
तरल पिसापरि...घाबरलेल्या
दुष्ट नष्ट अन् रात्र तिच्यांतच
टाकतसे एकेक चांदणी...

आज सकाळीं
जातांना परि पाणवठ्याला
कळशी नाही उरली कळशी
पाणी झालें...हिरवा सागर
रितेपणाचें
धडका देतें जें क्षितिजावर...

घाम डवरला; भिजलें कुंकू;
अडलें पाउल,
तुटलेल्या निःश्वासावरती,
दमली वाहुन...विश्व शिरावर...

उतट अनावर...वाट पाहते
क्षणांत यावी खाली

खळकन्

काळी खापर...
चिंब भिजावें...वाहुन जावें...
जलधारांतुन...या प्रळयांतुन...

REFBK-0016292

# आलें मी

वर्षेंतिल संध्येपरि
        आलें मी आवरीत
रक्ताचा जाळ लाल,
        दुःखाची गडद लाट.

वर्षेंतिल रात्रीपरि
        आलें मी सावरीत
नयनांतिल अश्रु निळे,
        हृदयांतिल वीज रक्त.

धगधगतें जीवन हें
        धरुन असें ओंजळींत
आलें मी कुठुन कशी...
        —आलें मी हेंच फक्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७३८९६ वि: काव्य
७८८७ नोंद दि: ५/३/७१

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. क्र. १६२०२
ठाणे